# शहर क्षयरोग नियंत्रण सोसायटी
महानगरपालिका, नागपूर


| | | |
|---|---|---|
| दुरध्वनी क्र.<br>कार्यालय : ०७१२ २५६७०३९<br>ई मेल :<br>DTOMHNGC@rntcp.org | DOTS | नोंदणीकृत कार्यालय :<br>शहर क्षयरोग कार्यालय,<br>सदर रोगनिदान केंद्र,<br>सदर,<br>नागपूर - ४४०००१. |
| डॉ. शिल्पा जिचकार<br>शहर क्षयरोग अधिकारी, व सदस्य सचिव<br>शहर क्षयरोग नियंत्रण सोसायटी, महानगर पालिका, नागपूर. | | जा.क्रं.:राक्षदुकाNotification/ १९४ /२०२३<br>दिनांक : ३०/११/२०२३ |


प्रति,

मा. कक्ष अधिकारी,

महाराष्ट्र शासन, मुंबई.

विषय :- विधानसभा तारांकित प्रश्न क्रमांक -७१७५९
राज्यातील क्षयरोगाचे पूर्ण उच्चाटन करण्याकरिता औषध पुरवठा व चाचणी किट उपलब्ध करून देण्याबाबत.

संदर्भ- आपले कार्यालयाचे इमेल दि. २८/११/२०२३

मा. महोदय,

उपरोक्त संदर्भीय विधानसभा तारांकित प्रश्न क्रमांक -७१७५९ अनुषंगाने राज्यातील क्षयरोगाचे पूर्ण उच्चाटन करण्याकरिता औषध पुरवठा व चाचणी कीट उपलब्ध करून देण्याबाबत" यांची सविस्तर माहिती सोबत जोडलेल्या प्रपत्रामध्ये जोडून देण्यात येत आहे.

सहपत्र - सोबत प्रपत्र जोडण्यात आलेले आहे.

शहर क्षयरोग अधिकारी,
म.न.पा., नागपूर

राष्ट्रिय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रम

मुख्य वैद्यकिय अधिकारी, राज्य क्षयरोग निर्मुलन व प्रशिक्षण केंद्र, नागपूर

विषय : तारांकित प्रश्न क्र. ७१७५९ चे उत्तर

संदर्भ : विधान सभा प्रश्न पत्र क्र.१ ब-१ दि.२१/११/२०२३ आणि मा. कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. विसप्र-२०२३/प्र.क्र.२३९/आरोग्य ५ दि. २४/११/२०२३

| अ.क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १ | राज्यात क्षयरोगाचे उच्चाटन करण्यासाठी शासनाने मोहिम हाती घेतली असतांनाही ग्रामिण व शहरी भागात मोठ्या प्रमाणात क्षयरोगाचे रुग्ण आढळुन आले आहेत, हे खरे आहे काय. | हे खरे नाही, राज्यशासनाकडुन प्राप्त लक्ष प्रमाणे नियंत्रित आहे |
| २ | तसेच मुंबईत क्षरोगाचे निदान लवकर होण्यासाठी आधुनिक सीबी नेट मशिनचा (जीन एक्सपर्ट) वापर सुरु असुन अवघ्या दोन तासात टीबीचा रुग्ण पॉझिटीव्ह असल्याचे यातुन निदान होते, परंतु दिः १५सप्टेंबर २०२३ रोजी पासुन पालिकेच्या टिबी डॉट्स केंद्रावरील चाचणी किट अभावी ट्रयुनेट आणि सीबी नेट मशिन्स वापरा विना पडुन असल्याने XDR आणि MDR चे रुग्ण ओळखणे कठिण झाले आहे, हे हि खरे आहे काय. | लागु नाही |
| ३ | असल्यास, राज्यात बहुतांश ठिकाणी क्षरोगावरील आवश्यक औषधांचा तुटवडा असल्यामुळे रुग्णांना ही औषधे बाहेरुन विकत घ्यावी लागत असल्याने त्यांना नाहक आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. हे हि खरे आहे काय. | हे लागु नाही, राज्यशासनाकडुन प्राप्त मार्गदर्शक सुचनाप्रमाणे क्षयरुग्णांने औषध खरेदी केल्यास त्यानां Reimbursement करुन देण्यात येते |
| ४ | असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन आवश्यक औषध पुरवठा व चाचणी किट तात्काळ उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे | लागु नाही |
| ५ | नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत. | लागु नाही |

शहर क्षयरोग अधिकारी
जिल्हा- म.न.पा. नागपुर

90

**कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर**
(सामान्य प्रशासन विभाग)
महानगरपालिका मार्ग, सिव्हील लाईन्स, नागपूर - ४४०००१
**Email Id – gadnmcnagpur@gmail.com**

पत्र क्र. :- साप्रवि/ वि.स.अता/ /२०२३ दिनांक:- २९/११/२०२३

**विधानमंडळ कामकाज/ कालमर्यादा /अति-तातडीचे**

प्रति,

मा.आरोग्य अधिकारी (एम)
आरोग्य विभाग
महानगरपालिका नागपूर.

विषय :- **विधानसभा तारांकित प्रश्न क्र.७१७५९.**
**"राज्यातील क्षयरोगाचे पूर्ण उच्चाटन करण्याकरीता औषध पुरवठा व चाचणी किट उपलब्ध करुन देण्याबाबत".**

संदर्भ :- नगर विकास विभाग महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.विसताप्र-२०२३/प्र.क्र.३५२/नवि-२० दिनांक:- २९/११/२०२३.

महोदय,

उपरोक्त संदर्भांकित विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, विधानसभा तारांकित प्रश्न क्र. ७१७५९.मा. श्री. मंगेश कुडाळकर (कुर्ला) व इतर विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेल्या मुद्दा क्र.०१ ते ०५ आपल्या विभागाशी संबंधित असल्यामुळे पाठविण्यात येत आहे. करीता स्वयंस्पष्ट अहवाल, पुरक टिप्पणीसह ud२०.urban-mh@mah.gov.in शासनाच्या संकेतस्थळावर पाठवण्यात यावी, तसेच पाठवण्यात येणाऱ्या उत्तराची एक प्रत gadnmcnagpur@gmail.com या ईमेलवर प्रत सुलभ माहितीसाठी या कार्यालयास पाठविण्याची विनंती आहे.

सहपत्र :- संदर्भिय पत्र

सहाय्यक अधिक्षक
सामान्य प्रशासन विभाग
महानगरपालिका नागपूर

प्रतिलीपी :-

१) मा. उपायुक्त, साप्रवि, म.न.पा. नागपूर यांना माहितीस्तव सादर.
२) मा. सहा. आयुक्त साप्रवि, म.न.पा. नागपूर यांना माहितीस्तव सादर.

आवक लिपीक
आरोग्य विभाग(मुख्यालय)
दिनांक 30-11-23